**सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात**

**नि.फौ.ख.क्र. १०८/२०२३.** **निशाणी क्र.३०**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | श्री. बाळासाहेब तुकाराम माकणीकर, |
| वय | – | ४९ वर्षे, |
| व्यवसाय | – | मंडप व्यवसाय, |
| राहणार | – | समतानगर झोपडपट्टी परंडा ता. परंडा जि. धाराशिव. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.एस.व्ही.भादुले साहेब यांचे मार्फत –**

माझे मुलीचे नाव सांची बाळासाहेब माकणीकर आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये ती ग्लोबल इंस्टीटयुट परंडा येथे क्लासला जात होती. मी आरोपी राजु कांबळेला ओळखतो. आरोपीने नोव्हेंबर २०२२ मध्ये मुलीची छेडछाड केली. आरोपी हा माझे मुलीला ती क्लासला जात असताना दम दयायचा, फोटो व्हायरल करेन, आई वडीलांना मारुन टाकीन, भावाला राहु देणार नाही, इज्ज़तीचा पंचनामा करुन टाकीन, इज्ज़त ठेवणार नाही असे म्हणायचा. आरोपीने माझे मुलीचा व त्याचा फोटो फेसबुक इन्स्टाग्रामवर फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. आरोपीने माझे मुलीचा व त्याचा फोटो फेसबुकवर व्हायरल केला होता, त्याची तारीख मला सांगता येत नाही. माझे मुलाला फोटो फेसबुकवर व्हायरल केल्याचा दिसला व त्याने मला घरी आल्यावर सांगितले. मुलीला मी रागाने विचारणा केली तेव्हा मुलीने मला आरोपीने तिला पूर्वी त्रास दिला होता परंतु भितीने तिने काही सांगितले नाही असे सांगितले. तसेच आरोपी तिची छेडछाड करीत असे सांगितले. मुलीला त्रास सहन न झाल्यामुळे तिने पोलीस

स्टेशनमध्ये तक्रार दिली. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. पोलीस स्टेशन व्यतिरीक्त मी न्यायालयात जबाब दिला होता. जबाब मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला न्यायालयात नोंदविण्यात आलेला जबाब दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३१** देण्यात आला. आरोपी शुभम कांबळे आज न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीं तर्फे विधीज्ञ श्री. ए.एस.राशिनकर यांचे मार्फत –</u>**

मी पोलीस स्टेशनला किती तारखेला जबाब दिला हे मला माहिती नाही. न्यायालयात मी किती तारखेला जबाब दिला त्याची तारीख मला आठवत नाही. आरोपीने माझ्या मुलीचा व त्याचा फोटो किती तारखेला व्हायरल केला हे मला माहित नाही. न्यायालयासमक्ष माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आला होता.

प्रश्न – जेव्हा तुम्ही पोलीस स्टेशनला तक्रार दयायला गेले होते तेव्हा तुमची मुलगी तुमच्या सोबत आली नव्हती ?

उत्तर – माझी मुलगीच तक्रार दयायला गेली होती.

माझी मुलगी महात्मा गांधी विद्यालयाला शिकायला होती. हे मला माहित नाही की, आरोपी न्यु कॉलेज येथे शिकायला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा आरोपी व माझे मुलीचे प्रेम संबंध जोडले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझे मुलीची लग्न करण्याची इच्छा होती. हे म्हणणे खरे नाही की, माझा लग्नास विरोध होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी मुलीस पुढे करुन आरोपीविरुध्द तक्रार देण्यास लावले.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आरोपीने नोव्हेंबर २०२२ मध्ये मुलीची छेडछाड केली, आरोपी हा माझे मुलीला ती क्लासला जात असताना दम दयायचा, फोटो व्हायरल करेन, आई वडीलांना मारुन टाकीन, भावाला राहु देणार नाही, इज्ञतीचा पंचनामा करुन टाकीन, इज्ञत ठेवणार नाही असे म्हणायचा, आरोपीने माझे मुलीचा व त्याचा फोटो फेसबुक इन्स्टाग्रामवर फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली,

हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझे मुलीचा व त्याचा फोटो फेसबुक इन्स्टाग्रामवर फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली, आरोपीने माझे मुलीचा व त्याचा फोटो फेसबुकवर व्हायरल केला होता, माझे मुलाला फोटो फेसबुकवर व्हायरल केल्याचा दिसला व त्याने मला घरी आल्यावर सांगितले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे मुलीस मी आरोपीविरुध्द बळजबरीने खोटी तक्रार दयायला लावली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.10.01 17:15:26 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–०१.१०.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.